# प्रेसनोट

कर आकारणी व कर संकलन कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक ३१/०५/२०२६

**विषय:- मिळकतकराचा केवळ ६० दिवसात रक्कम रु. १२०० कोटींचा भरणा**

पुणे महानगरपालिकेच्या कर आकरणी व करसंकलन विभागामार्फत सन २०२६-२७ नागरिकांच्या सोयीसाठी व कर भरण्यास प्रोत्साहन देण्यासाठी मिळकत कराच्या सर्वसाधारण करामध्ये ५/१०% सवलत जाहीर करण्यात आलेली होती. दि. ३१ मे २०२६ पर्यंत ज्या नागरिकांनी आपला संपूर्ण मिळकतकर विहित मुदतीत भरला त्यांना या सवलतीचा लाभ देण्यात आला.

पुणे महानगरपालिका हद्दीत एकूण मिळकतींची संख्या **१५.०५ लक्ष** इतकी असून दि. ०१/०४/२०२६ ते दि. ३१/०५/२०२६ अखेर (रात्री ९.५० वाजेपर्यंत) **६,४४,१७४** इतक्या मिळकतधारकांनी रक्कम रु. **१२००.४७ कोटी** इतका मिळकतकर पुणे महानगरपालिकेकडे जमा केलेला आहे. यामध्ये **६८,५०१ (१०.६०%)** इतक्या मिळकतधारकांनी रक्कम रु.**३१४.९३ कोटी** इतकी रक्कम धनादेशाद्वारे जमा केलेली आहे. तर **१,०२,६९१** (१५.०९%) इतक्या मिळकतधारकांनी रक्कम रु. **९५.४३ कोटी** इतकी रोख रक्कम स्वरूपात जमा केलेली आहे. तसेच सर्वाधिक **४,७५,३७२ (७३.५०%)** इतक्या नागरिकांकडून online / digital प्रणालीद्वारे रक्कम रु **७९०.११ कोटी** जमा करण्यात आले आहे.

(रवि पवार)
उप आयुक्त
कर आकारणी व कर संकलन प्रमुख
पुणे महानगरपालिका